0 8 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी पौर्वात्याभिमुख व्हावे

## चिनी कॉन्सुल जनरल झिन्हुआ यांचा विद्यापीठात विद्यार्थ्यांशी संवाद



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि चीनमधील विद्यापीठे यांच्यात सहकार्यवृद्धीबाबत मुंबईतील चीनचे कौन्सुल जनरल काँग झिन्हुआ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शिवाजी विद्यापीठास भेट दिली. शेजारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासमवेत चिनी शिष्टमंडळ.

**कोल्हापूर, ता. ७ : 'जागतिक पातळीवर चीन आज उच्च शिक्षणासह अनेक क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांनी आता पाश्चिमात्य राष्ट्रांऐवजी या पौर्वात्य राष्ट्राला पसंती द्यावी,' असे आवाहन चीनचे मुंबईतील कॉन्सुल जनरल काँग झिन्हुआ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात विद्यार्थ्यांसमवेत आयोजित खुल्या संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.**

झिन्हुआ म्हणाले, 'चीनने ऑटोमेशन, रोबोटिक्स, इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल्ससह कृषी, कृषिपूरक क्षेत्रांमध्येही कृत्रिम बुद्धिमत्ता, रिअल टाइम डेटा यांच्या साह्याने मोठी क्रांती घडविली आहे. मटेरियल सायन्स, रसायनशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांसह सर्वसाधारण जागतिक रँकिंगमध्ये चीनमधील सरासरी आठ विद्यापीठे आहेत. चीनमध्ये बहुतांश विद्यापीठे शासकीय असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळाली नाही, तरी शिक्षण शुल्क माफक असल्याने ते परवडते.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'चिनी दुतावासाने चीनमधील दोन ते तीन विद्यापीठे निवडण्यास शिवाजी विद्यापीठास मदत करावी. त्या विद्यापीठातील निवडक शिक्षक, संशोधक आणि महाराष्ट्रातील शिक्षक, संशोधकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यासाठी विद्यापीठ पुढाकार घेईल. त्या बैठकीत भाषिक शिक्षणास प्रोत्साहनापासून ते शैक्षणिक, संशोधकीय आदानप्रदानापर्यंत सर्व प्रकारची चर्चा होऊन ठोस कृतिशील पर्यायांपर्यंत पोहोचता येऊ शकेल.'

दरम्यान, शिवाजी विद्यापीठ, चीनमधील शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य वृद्धीच्या अनुषंगाने दोन्ही बाजूंच्या शिष्टमंडळांमध्ये चर्चा झाली. दिल्लीतील चिनी दुतावासाचे शैक्षणिक कौन्सिलर यांग झिहुआ यांनी त्यासंदर्भातील सादरीकरण केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डॉ. सागर डेळेकर यांनीही सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. डॉ. सुधींद्र कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांनी समन्वयक म्हणून भूमिका बजावली.

चिनी शिष्टमंडळातर्फे मुंबईतील चिनी कॉन्सुलेटचे वाणिज्य कौन्सिलर झँग हाँगयू, सहकौन्सुल झिआँग फँगझिंग, पॅन झिवेई, चीनी दुतावासाचे प्रथम सचिव फू झिआनफेंग यांनी आणि शिवाजी विद्यापीठातर्फे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय समन्वय कक्षाचे समन्वयक डॉ. एस.बी. सादळे यांनी चर्चेचे संयोजन केले.

08 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय विद्यार्थ्यांना चीनमध्ये शिक्षण, रोजगाराच्या संधी

## चीनी कॉन्सुल जनरल काँग झिन्हुआ : शिवाजी विद्यापीठात साधला विद्यार्थ्यांशी संवाद



कोल्हापूर : चीनचे कौन्सुल जनरल काँग झिन्हुआ यांनी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारतीय विद्यार्थ्यांनी आता पाश्चिमात्य राष्ट्रांऐवजी या पौर्वात्य राष्ट्राला पसंती द्यावी. भारत आणि चीनमधील विद्यार्थी–शिक्षक आदानप्रदानामुळे भारतीय विद्यार्थ्यांना चीनमध्ये शिक्षण, रोजगार, संशोधनाच्या संधी प्राप्त होतील, असे प्रतिपादन चीनचे मुंबईतील कॉन्सुल जनरल काँग झिन्हुआ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित खुल्या संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. चीनने नजीकच्या कालखंडात विविध क्षेत्रांत साधलेल्या प्रगतीविषयी व तेथील शैक्षणिक, रोजगार व नोकरीच्या संधीविषयी विद्यार्थ्यांना सादरीकरण दाखविले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

काँग झिन्हुआ म्हणाले, जागतिक पातळीवर उत्पादन क्षेत्रात अग्रेसर असलेल्या चीनने ऑटोमेशन, रोबोटिक्स, अत्याधुनिक इलेक्ट्रीक ऑटोमोबाईल्ससह कृषी आणि कृषीपूरक क्षेत्रांमध्येही कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रिअल टाइम डेटा यांच्या सहाय्याने मोठी क्रांती घडविली आहे.

चीनमध्ये बहुतांश विद्यापीठे शासकीय असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप जरी मिळाली नाही, तरी माफक शिक्षण शुल्क आहे. भाषा आणि खाद्यसवयी याच अडचणी आहेत. त्यासाठीच आम्ही भारतामध्ये चीनी भाषेचा अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रयत्नात असल्याचे काँग झिन्हुआ यांनी सांगितले.

प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व डॉ. सागर डेळेकर यांनी सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. डॉ. सुधींद्र कुलकर्णी यांनी समन्वयक म्हणून काम पाहीले. चीनी शिष्टमंडळातर्फे मुंबई चीनी कॉन्सुलेटचे वाणिज्य कौन्सेलर झँग हाँगयू, सहकौन्सुल झिआँग फँगझिंग व पॅन झिवेई, चीनी दुतावासाचे प्रथम सचिव फू झिआनफेंग व शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश पवार यांनी सहभाग घेतला.

### भारतीय विद्यार्थ्यांना संधी

भारत आणि चीनमधील विद्यार्थी–शिक्षक आदानप्रदान, सांस्कृतिक, शैक्षणिक साहचर्य, भारतामध्ये चीनी भाषा व अभ्यासक्रम, डिजीटल शिक्षणास प्रोत्साहन या पाच सूत्रांच्या आधारे भारतीय विद्यार्थ्यांना चीनमध्ये संधी मिळेल, असे दिल्लीतील चीनी दूतावासाचे शैक्षणिक कौन्सेलर यांग झिहुआ यांनी सांगितले.

### शाश्वत भागीदारी साकारणे आवश्यक

चीनी दूतावासाने चीनमधील दोन ते तीन विद्यापीठे निवडण्यास शिवाजी विद्यापीठास मदत करावी. त्या विद्यापीठांतील निवडक शिक्षक, संशोधक यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ पुढाकार घेईल. यामुळे दोन्ही देशांतील विद्यापीठांमध्ये शाश्वत स्वरुपाची भागीदारी आकारास येईल, असे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
0 8 MAR 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांनी जाणून घेतले विज्ञान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि यू.जी.सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटिझ् यांच्यातर्फे कोल्हापूर आणि सांगली येथील विविध शाळांत शिकणाऱ्या दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय सुगम्य विज्ञान कार्यक्रम झाला.

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी आणि शालेय अभ्यासक्रमातील प्रयोग करता यावेत, यासाठी जीव, भौतिक, रसायन व वनस्पती या शास्त्रांवर आधारित विविध प्रयोग वेगवेगळ्या मॉडिलच्या माध्यमातून प्रत्यक्ष शिकवण्यात आले. यामध्ये विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील तसेच राजाराम विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सहभाग नोंदवला. उद्घाटनप्रसंगी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या माजी प्रमुख डॉ. अंजली निगवेकर उपस्थित होत्या.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला. ते म्हणाले, 'हे प्रयोग अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. या प्रयोगांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे गरजेचे आहे. विद्यापीठातील विविध विज्ञान शाखांतील विद्यार्थी संशोधकांनी अशा प्रयोगांच्या निर्मितीमध्ये योगदान देण्यासाठी पुढे यावे.'

प्रकल्प सहायक सतीश नवले यांनी प्रयोग निर्मिती केली. आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. अक्षदा बिराजदर यांनी सूत्रसंचालन केले. रोहन लाखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2025
सकाळ

# मलकापूरला सोमवारी राष्ट्रीय चर्चासत्र

मलकापूर, ता. ७ : येथील प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयात ''विकसित भारत आव्हाने व संधी'' या विषयावर सोमवारी (ता. ११) राष्ट्रीय चर्चासत्र आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी दिली. ते म्हणाले, ''चर्चासत्राचे उद्‌घाटन व बीजभाषण शिवाजी विद्यापीठातील प्रो. डॉ. एस. एस. महाजन करणार आहेत. विद्यापीठातील अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो. डॉ. जे. एस. इंगळे साधन व्यक्ती म्हणून असणार आहेत. राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वी करण्यसाठी संशोधकांनी संशोधन पेपर पाठवावेत व उपस्थित राहावे, असे आवाहन सचिव प्रो. डॉ. एस. पी. बनसोडे व प्रा. आर. एस. सुतार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 MAR 2025
तरुण भारत

# सेंद्रिय खताच्या निर्मितीतून दिला शेतकऱ्यांना 'आधार'

## सुप्रिया कुसाळे यांच्या संशोधनाला पेटंट : शिवाजी विद्यापीठाने दिली प्रकल्पास जागा : १५ हजार शेतकरी करतात खताचा वापर



बायोबुस्टर जैविक खत निर्मिती करताना सुप्रिया कुसाळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठात संशोधन करत असलेल्या सुप्रिया कुसाळे यांच्या 'इकोफ्रेंडली अँड कॉस्ट इफेक्टिव्ह प्रॉडक्शन ऑफ फायटेज प्रोड्युसिंग बायोईनॉक्युलन्ट अँड इट्स इफिकसी इन फील्ड' संशोधनास केंद्राचे पेटंट मिळाले आहे. या संशोधनातून सुप्रियाने पर्यावरणपूरक, जैविक खत तयार केले आहे. हे खत लिक्विडमध्ये असून पिकांना आळवणी केल्यास वाढीसाठी त्याचा मोठा फायदा होत आहे. या खतामुळे आतापर्यंत ऊस, मका, मिरची, आले, हळद, ज्वारी, भात, पालेभाज्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ झाल्याचे दिसून आले आहे. सध्या पंधरा हजार शेतकरी सुप्रिया यांच्या सेंद्रीय खताचा वापर करत आहेत.

सुप्रिया कुसाळे या वडीवळेच्या रहिवाशी आहेत. राजाराम कॉलेजमध्ये पीएच.डी. करत असतानाच त्यांनी अविष्कार संशोधन स्पर्धेत सहभाग नोंदवला. राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळवल्याने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत त्यांना संधी मिळाली. मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने पेटंट फाईल करून त्यांच्या संशोधनाला केंद्राचे पेटंट मिळाले आहे.

नारी शक्ती
महिला दिन विशेष

शिवाजी विद्यापीठाने सुप्रिया कुसाळेंच्या स्टार्टअपसाठी विद्यापीठात जागा उपलब्ध करून दिल्याने त्या खताची निर्मिती मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होत आहे. जेवढी खतनिर्मिती होतेय त्याहेक्षा जास्त खताला मागणी आहे. मातीमधून जीवाणू शोधून काढून औषध निर्मिती केली आहे.

या संशोधनाचे विद्यापीठात इन्क्युबेट होऊन स्टार्टअपमध्ये रूपांतर झाले असून, सारथीची दरमहा २५ हजार रूपये फेलोशिप मिळते. आतापर्यंत ८ लाख रूपये खर्च करून खत निर्मिती केली. या संशोधनाला राष्ट्रीय पारितोषिक, बायो स्टार्टअप अवॉर्ड मिळाला.

सुप्रियांचा हा प्रवास कष्ट, चिकाटी, शिक्षण, कौटुंबिक पाठबळ आणि टीमच्या अथक मेहनतीने यशस्वी झाला आहे.

संशोधनात सातत्याने संकल्पनातून सुधारणा कुसाळे कुटुंबियांचा पाठिंबा आणि प्रतिक कुसाळेंचे सहकार्य हा या यशाचा महत्त्वाचा घटक ठरला. ही टीम सतत नवकल्पना, सुधारणा करण्यासाठी काम करते.

**राज्यासह इतर राज्यात इनक्युबेशनचा मानस**

अविष्कार स्पर्धांमध्ये विद्यापीठ, राष्ट्रीय पातळीवरील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाला युवा संशोधक पुरस्कार मिळवला. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदांमध्ये सादरीकरण, बायोस्टार्टअप अवॉर्ड मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियात महत्त्वाची कामगिरी केली. आतापर्यंत एक पेटंट आणि १०० संशोधन पेपर सादर केले आहेत. जैविक खताचे व्यावसायिक उत्पादन, विक्री वाढविण्यासाठी विविध राज्यात इनक्युबेशन सेंटर काढण्याचा मानस आहे.

- डॉ. सुप्रिया कुसाळे, संशोधक, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2025

तरुण भारत

# न्यू कॉलेजमध्ये संख्याशास्त्र विषयावर कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** न्यू कॉलेजमधील संख्याशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'संख्याशास्त्राचे व्यावहारिक उपयोग एक्सप्लोर करणे" या विषयावरील आयोजित कार्यशाळा उत्साहात पार पडली. प्रमुख पाहुणे म्हणूक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते. न्यू कॉलेजचे प्राचार्य प्रा. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. एस. बी. महाडिक यांनी सुस्ता संघटनेची माहिती दिली. न्यू कॉलेज संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. डी. जी. गोडसे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे व्हा चेअरमन डी. जी. किल्लेदार, संचालक वाय. एल. खाडे, प्राचार्य पी. के. पाटील, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य आर. डी. ढमकाले व प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात डॉ. एस. बी महाडीक यांनी गणित आणि संख्याशास्त्रमधील फरक सांगितला. डॉ. एस. डी. पवार यांनी एखाद्या वस्तूची किंमत आणि वॉरंटी ठरवण्यासाठी संख्याशास्त्रचा कसा उपयोग होऊ शकतो हे सांगितले. डॉ. अजिंक्य कोठावळे यांनी 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण' विषयी माहिती दिली. सांख्यशास्त्रातील करिअरच्या संधीं यावर चर्चा झाली. त्यानंतर कार्यशाळेचा समारोप झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 MAR 2025

पुढारी

# विद्यापीठ प्रवेश परीक्षांसाठी आजपासून अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदवी, पदव्युत्तर प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार शनिवार (दि. ८) पासून अर्ज प्रक्रियेस सुरुवात होणार असून एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. ८ मार्च ते ८ एप्रिल या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. यामध्ये एम.एस्सी. केमेस्ट्री, इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, झूलॉजी, फिजिक्स, मॅथेमॅटिक्स, मायक्रोबायोलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, एमबीए (रूरल मॅनेजमेंट) आदी विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे. १३ ते १७ मे दरम्यान परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रवेश परीक्षांबाबतची सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

0 8 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अंतिम दिवस ‘तंत्रज्ञान’ने गाजविला

## क्रिकेट, रस्सीखेचसह बास्केटबॉलमध्ये पटकावले विजेतपद

### शिवस्पंदन क्रीडा महोत्सव



कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात पुरुष रस्सीखेच स्पर्धेत विजेतपद मिळविणारा तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ.

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामध्ये आज अखेरच्या पाचव्या दिवशी क्रिकेट, रस्सीखेचसह बास्केटबॉलमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी विजेतपद मिळविले.

सकाळच्या सत्रात झालेल्या महिलांच्या क्रिकेटमधील अंतिम सामन्यात गणित अधिविभागावर मात करीत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, तर गणित अधिविभागाला द्वितीय आणि नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने तृतीय क्रमांक मिळवला. महिलांच्या बास्केटबॉल स्पर्धेतही तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, गणित अधिविभागाने द्वितीय, क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक मिळवला.

महिलांच्या रस्सीखेच स्पर्धेत नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, क्रीडा अधिविभागाने द्वितीय, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने तृतीय क्रमांक मिळवला. पुरुषांच्या रस्सीखेच स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, ‘वाय.सी.एस.आर.डी.’ने द्वितीय आणि क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक मिळवला. सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, संचालक आणि व विद्यार्थ्यांचे क्रीडा व शारीरिक संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी अभिनंदन केले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. राजाराम गुरव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. वाय. एन. कांचे, डॉ. तृप्ती करीकट्टी, डॉ. राहुल माने, डॉ. ज्योती जाधव, डॉ. अण्णा गोफणे, डॉ. नवनाथ वलेकर, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. किरण पाटील, डॉ. राम पवार, डॉ. धनंजय पाटील, डॉ. नीलेश पाटील, प्रा. एन. आर. कांबळे, डॉ. विक्रम नांगरे- पाटील, सुभाष पवार, सुचय खोपडे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. मनीषा शिंदे, प्रदीप हंकारे, विजय कांबळे, आनंदा तळेकर, सुनील देसाई, शरद चव्हाण, तौहीद मुल्ला, शुभम काशीद, संग्राम गुरव, आकाश पाटील आदींनी परिश्रम घेतले.

### अॅथलेटिक्सचा अंतिम निकाल

■ चार बाय १०० रिले : क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि जीवशास्त्र अधिविभाग.

■ लांबउडी (महिला) : देवयानी सबनीस (तंत्रज्ञान अधिविभाग), अंजली लोहार (अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान), नंदिनी कुंभार (गणित).

■ ४०० मी. (महिला) : मनीषा पाटील (क्रीडा), अनुष्का भोसले (गणित), अनुष्का पाटील (क्रीडा).

■ १०० मी. (पुरुष) : आर्यन शेजाळ (क्रीडा), क्रिश पोतदार (क्रीडा), नड्लान्झी बोनगिनकोसी मायकल (वाणिज्य व व्यवस्थापन).


0 8 MAR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवस्पंदन'च्या अखेरच्या दिवसावर तंत्रज्ञान अधिविभागाचे वर्चस्व

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामध्ये शुक्रवारी अखेरच्या पाचव्या दिवशी क्रिकेटसह बास्केटबॉलमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी विजेतेपद मिळविले.

महिलांच्या क्रिकेटमधील अंतिम सामन्यात गणित अधिविभागावर मात करीत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळविला. गणित अधिविभागाला द्वितीय आणि नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला. महिलांच्या बास्केटबॉल स्पर्धेतही तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळविला. गणित अधिविभागाने द्वितीय, तर क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. महिलांच्या रस्सीखेच स्पर्धेत नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, क्रीडा अधिविभागाने द्वितीय आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट (वाय.सी.एस.आर.डी.) ने तृतीय क्रमांक पटकावला. पुरुषांच्या रस्सीखेच स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, वाय. सी. एस. आर. डी. ने द्वितीय आणि क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला.



**कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात पुरुष रस्सीखेच स्पर्धेत विजेतेपद मिळविणारा तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ. (छाया : नाज ट्रेनर)**

### ॲथलेटिक्स स्पर्धेचा अंतिम निकाल

१०० रिले - क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि जीवशास्त्र अधिविभाग. लांब उडी (महिला)- देवयानी सबनीस (तंत्रज्ञान अधिविभाग), अंजली लोहार (अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान), नंदिनी कुंभार (गणित). ४०० मी. (महिला)- मनीषा पाटील (क्रीडा), अनुष्का भोसले (गणित), अनुष्का पाटील (क्रीडा). १०० मी. (पुरुष)- आर्यन शेजाळ (क्रीडा), क्रिश पोतदार (क्रीडा), नड्लान्झी बोनगिनकोसी मायकल (वाणिज्य व व्यवस्थापन).

शिवस्पंदन क्रीडा महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सहाय्य करणाऱ्या सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, संचालक व विद्यार्थ्यांचे क्रीडा व शारीरिक संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी अभिनंदन केले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. राजाराम गुरव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. वाय. एन. कांचे, डॉ. तृप्ती करीकट्टी, डॉ. राहुल माने, डॉ. ज्योती जाधव आदींनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 MAR 2025

तरुण भारत

# शिवस्पंदन क्रीडा स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाचा दबदबा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामध्ये अखेरच्या दिवशी क्रिकेट, बास्केटबॉल, रस्सीखेच, ॲथलेटिक्स स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी विजेतेपद मिळविले.

सकाळच्या सत्रात झालेल्या महिलांच्या क्रिकेटमधील अंतिम सामन्यात गणित अधिविभागावर मात करत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळविला. गणित अधिविभागाला द्वितीय आणि नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला. महिलांच्या बास्केटबॉल स्पर्धेतही तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळविला. गणित अधिविभागाने द्वितीय तर क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. महिलांच्या रस्सीखेच स्पर्धेत नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, क्रीडा अधिविभागाने द्वितीय आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट (वाय.सी.एस.आर.डी.)ने तृतीय क्रमांक पटकावला. पुरुषांच्या रस्सीखेच स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, वाय.सी.एस.आर.डी.ने द्वितीय आणि क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2025
पुण्यनगरी

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२५-२०२६

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर / एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून दि.०८/०३/२०२५ ते दि.०८/०४/२०२५ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत-

तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि. ०८/०३/२०२५ ते दि. ०८/०४/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे. उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील (Admission Notification) विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंक लिहून घ्यावी व लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

ठिकाण : कोल्हापूर
दि. ०८/०३/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2025
लोकमत

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२५-२०२६

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर / एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून दि.०८/०३/२०२५ ते दि.०८/०४/२०२५ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत-

तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि. ०८/०३/२०२५ ते दि. ०८/०४/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे. उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील (Admission Notification) विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंक लिहून घ्यावी व लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

ठिकाण : कोल्हापूर
दि. ०८/०३/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२५-२०२६

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर / एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून दि.०८/०३/२०२५ ते दि.०८/०४/२०२५ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत-

तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि. ०८/०३/२०२५ ते दि. ०८/०४/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे. उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील (Admission Notification) विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंक लिहून घ्यावी व लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

ठिकाण : कोल्हापूर
दि. ०८/०३/२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

0 8 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दामिनी जागतिक महिला दिन विशेष

**महिलांच्या चळवळीची सुरुवात जागतिक स्तरावर युरोप आणि अमेरिकेत झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी, आजच्या विकसित देशांमध्ये महिलांना मतदान करण्याचादेखील अधिकार नव्हता. महिलांचे कामकाज घरापुरतेच मर्यादित होते. स्त्रियांचे सामाजिक दुय्यम स्थान आणि हलाखीचे जीवन यांचा परिणाम ब्रिटन व अमेरिका या देशांतील महिलांनी पुरुषी वर्चस्वाला विरोध करण्यास सुरुवात केली.**

## महिलांच्या सक्षमीकरणासाठीच

# 'स्त्री अभ्यास केंद्र'

सेनेका फॉल्स (न्यूयॉर्क) येथे १८४८ ला पहिल्यांदा महिला हक्क परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत तीनशेपेक्षा जास्त व्यक्तींनी सहभाग घेतला आणि या परिषदेमध्ये 'जन्माने सर्व पुरुष व महिला समान आहेत,' हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. याचा परिणाम मालमत्तेचा हक्क, शिक्षण, चर्चमध्ये प्रवेश, व्यवसाय आणि राजकारणातील संधी अशा मागण्या करण्यास सुरुवात झाली. महिला कामगारांची स्थिती, शोचनीय अवस्थेला विरोध करण्यासाठी न्यूयॉर्क शहरातील महिला कामाचे तास, वेतन आणि मतदानाचा हक्क या मागण्यांसाठी रस्त्यावर आल्या. दि. ८ मार्च, १९०८ रोजी घडलेली ही घटना. 'सोशालिस्ट पार्टी ऑफ अमेरिका' यांनी १९०९ पासून 'राष्ट्रीय महिला दिन' जाहीर केला. दोन वर्षांतच महिला दिन साजरा करण्यासाठी दहा लाख लोक वेगवेगळ्या रॅलीमध्ये सहभागी झाले. संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला दशक' आणि १९७७ या वर्षी ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. 'सर्व महिला आणि मुलींचे हक्क, समानता आणि सक्षमीकरण' ही या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या दरम्यान भारतात व्यापक स्वरूपात स्त्री चळवळीला जोमाने सुरुवात झाली आणि स्त्रियांच्या सर्वांगीण विषयावर भारत सरकारने 'टूवर्डस् इक्वॅलिटी' हा पहिला अहवाल प्रसिद्ध केला. स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या पुढाकाराने अनेक चर्चासत्रे, कार्यशाळा, व्याख्याने आणि ग्रंथ प्रकाशन करण्यात



आली आणि यातूनच १९८० भारतीय सामाजिक, विज्ञान अनुसंधान परिषद यांच्या सहकार्याने स्त्री अभ्यास केंद्राची औपचारिक स्थापना झाली. युजीसीच्या आकडेवारीनुसार सध्या १५९ स्त्री अभ्यास केंद्रे भारतात कार्यरत आहेत. स्त्री-पुरुष समानता, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण, महिलांचे मानवी हक्क, सामाजिक जाणीव जागृती या विषयांवर प्रामुख्याने अभ्यास करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्रे, महिला महाविद्यालये, महिला विभाग (सेल) स्थापन करण्यात आलेले आहेत. शिवाजी विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राला विद्यापीठ अनुदान आयोगाने २००० या वर्षी ८ मार्च या दिवशी मान्यता दिली. १६ फेब्रुवारी, २००० या दिवशी 'युजीसी'कडून मंजुरी दिल्याचे पत्र विद्यापीठाला प्राप्त झाले. या पत्रानुसार स्त्री अभ्यास केंद्राला अधिविभागाचा दर्जा देण्यात आला आणि पूर्णवेळ संचालकपदाची मान्यता देण्यात आली. स्त्री अभ्यास केंद्राला २४ वर्षे पूर्ण झाली असून, २०२५ हे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांच्या पुढाकाराने स्त्री अभ्यास केंद्राची सुरुवात ८ मार्च, १९९६ रोजी झाली. इंग्रजी विभागाच्या डॉ. माया पंडित यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सल्लागार समितीत डॉ. वासंती रासम (राज्यशास्त्र विभाग), पुष्पा भावे (पुणे), डॉ. कमला गणेश, मीनाक्षी मून, हुसेन जमादार (कोल्हापूर), श्रीमती अल्बर्टिना यांचा समावेश होता. स्थानिक समितीमध्ये डॉ. अकल्पिता अरविंदेकर (बायोकेमिस्ट्री), डॉ. मेधा नानिवडेकर (राज्यशास्त्र विभाग), भारती पाटील, (राज्यशास्त्र विभाग), सुमित्रा जाधव (ग्रंथालय शास्त्र) यांचा समावेश होता. बायोकेमिस्ट्री विषयाच्या डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांची स्त्री अभ्यास केंद्राच्या दुसऱ्या समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. राज्यशास्त्र विषयाच्या डॉ. मेधा नानिवडेकर १९९८ ते २००४ पर्यंत स्त्री अभ्यास केंद्राच्या तिसऱ्या समन्वयक म्हणून कार्यरत होत्या. १२ सप्टेंबर, २००५ ते नोव्हेंबर, २०२४ या १९ वर्षांच्या कालावधीत डॉ. मेधा नानिवडेकर पूर्णवेळ संचालक होत्या. त्या निवृत्त झाल्यानंतर विद्यापीठाने जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या विषयाच्या वरिष्ठ प्राध्यापक निशा मुडे-पवार यांना स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रभारी संचालकपदाची जबाबदारी सोपवली. विद्यापीठ अनुदान आयोगाने दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत विद्यापीठात स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करण्याची मान्यता दि. १६ फेब्रुवारी, २००० रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. यानुसार स्त्री अभ्यास केंद्राला पूर्णवेळ संचालक (प्राध्यापक/प्रपाठक) नियुक्त करण्याची मान्यता तसेच अर्थसहाय्य देण्याचे मंजूर केले आहे. त्याआधी १९९६ ला विद्यापीठाने स्त्री अभ्यास केंद्राची सुरुवात केली. त्यावेळी इंग्रजी, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र विषयांच्या एम.ए. पदव्युत्तर अभ्यासक्रमात महिलाविषयक स्वतंत्र पेपर विद्यापीठात शिकवण्यात येत होता. १९९६-९७ या वर्षभराच्या कालावधीत स्त्री अभ्यास केंद्राने ११ उपक्रम राबवले. अभ्यासक्रमाच्या संदर्भातील कार्यशाळा, 'महिला आणि माध्यमे' या विषयावरील सेमिनार, 'एड्स' या विषयावर स्लाईड शो, 'स्त्री शिक्षण आणि आर्थिक धोरण' या विषयावर कुमुद पोरे यांचे व्याख्यान, 'महिला आणि चित्रपट' या विषयावर कार्यशाळा, तसेच 'निवडणूक मोहिमेतील महिलांचा सहभाग' आणि 'शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे जेंडर परसेप्शन' या विषयावर संशोधन प्रकल्प यांचा प्रामुख्याने समावेश होता.

सन १९९९ मध्ये डॉ. लीना मेहेंदळे आणि छाया दातार यांनी स्त्री अभ्यास केंद्राचा मूल्यमापन करणारा अहवाल तयार केला आणि केंद्रासाठी आर्थिक तरतुदींची शिफारस केली. एम. ए. वूमेन स्टडीज आणि सर्टिफिकेट कोर्स इन जेंडर सेन्सटायझेशन या अभ्यासक्रमांना व्यवस्थापन परिषदेच्या २३ मे, २०१४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ३५ नुसार, आंतरशाखीय विषयांतर्गत मान्यता देण्यात आली. विद्यापीठाने स्त्री अभ्यास केंद्राचे अस्थायी मंडळ २००१ ला स्थापन केले. राज्यशास्त्र विषयात 'वूमेन अँड पॉलिटिकल थेअरी', समाजशास्त्र विषयासाठी 'वूमेन अँड सोसायटी', अर्थशास्त्र विषयासाठी 'जेंडर अँड डेव्हलपमेंट' अशा चार क्रेडिटचा पेपर सुरू करण्यात आला. विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राने महाराष्ट्रात पहिल्यांदा जुलै २००० या वर्षी एम.फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमांना सुरुवात केली. पहिल्याच वर्षी पीएच.डी. (दोन), एम.फिल. (चार) विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी नोंदणी केली. डॉ. मंजूषा देशपांडे यांनी २००७ मध्ये डॉ. मेधा नानिवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'कोल्हापूर जिल्ह्यातील स्थलांतरित ऊसतोड महिला कामगार' यांच्या आरोग्याबाबत आपला पीएच.डी. प्रबंध आणि २००८ या वर्षी अनिल घडस यांनी 'खुशवंतसिंग यांच्या लघुकथेतील महिलांचे नातेसंबंध' या विषयावर लघुप्रबंध पूर्ण केला. 'जेंडर इक्वॅलिटी' हा सातवा निकष नॅक (बंगळूर) मूल्यांकनामध्ये अत्यावश्यक आहेच, पण त्याही पलीकडे 'स्त्री-पुरुष समानता तत्त्व' आणि बीजिंग परिषदेच्या जाहीरनाम्याची तीस वर्षे या पार्श्वभूमीवर अभ्यास केंद्राचे महत्त्व अधोरेखित होते.

- प्रा. (डॉ.) निशा मुडे-पवार
संचालिका, स्त्री अभ्यास केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर